# भारतीय समाज विकास व संशोधन संस्था



कुमारविश्व, मु.पो. खेडनगर, ता. कर्जत, जि. अहमदगनर ४१४४०३

## ✻ विश्वस्त मंडळ ✻

| | |
|---|---|
| ✻ डॉ. कुमार सप्तर्षी | कार्यकारी विश्वस्त / अध्यक्ष |
| ✻ श्री. मकरंद सप्तर्षी | सचिव |
| ✻ डॉ. अशोक जोशी | विश्वस्त सदस्य |
| ✻ डॉ. प्रवीण सप्तर्षी | विश्वस्त सदस्य |
| ✻ डॉ. ऊर्मिला सप्तर्षी | विश्वस्त सदस्य |
| ✻ डॉ. अंजली सोमण | विश्वस्त सदस्य |
| ✻ प्राचार्य एन.बी जाधव | विश्वस्त सदस्य |
| ✻ प्रा. डॉ. नंदाताई पाटील | विश्वस्त सदस्य |
| ✻ श्री. रविंद्र धनक | विश्वस्त सदस्य |

---

भारतीय समाज विकास व संशोधन संस्था संचलित

# राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालय

कुमारविश्व, मु.पो. खेडनगर, ता. कर्जत, जि. अहमदगनर ४१४४०३

## ✻ महाविद्यालय स्थानिक व्यवस्थान समिती ✻

| | |
|---|---|
| ✻ प्रा. एन. बी. जाधव | अध्यक्ष |
| ✻ डॉ. सुभाष पिंगळे | सचिव |
| ✻ डॉ. प्रवीण सप्तर्षी | संस्था प्रतिनिधी सदस्य |
| ✻ डॉ. ऊर्मिला सप्तर्षी | संस्था प्रतिनिधी सदस्य |
| ✻ डॉ. ज्योतीराम मोरे | संस्था प्रतिनिधी सदस्य |
| ✻ प्रा. संदीप काळे | शिक्षक प्रतिनिधी सदस्य |
| ✻ प्रा. दिलीप सोनटक्के | शिक्षक प्रतिनिधी सदस्य |
| ✻ प्रा. ऊर्मिला शिंदे | शिक्षक प्रतिनिधी सदस्य |
| ✻ श्री. भगवान काळे | शिक्षकेत्तर प्रतिनिधी सदस्य |

**प्रिय विद्यार्थी मित्रहो,**

राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालयात मी, आपले मनःपूर्वक स्वागत करतो. हे महाविद्यालय स्थापनेपासून ग्रामीण भागातील तरूणांच्या जडण-घडणीचे मोलाचे कार्य करीत आहे. 'उत्तम शिक्षण' हे मुळ सुत्र समोर ठेवून महाविद्यालय सतत चांगल्या शिक्षणासाठी प्रयत्नशील आहे. परिणाम स्वरूप या परिसराचे जीवन महाविद्यालयातील अध्यापकांच्या सकारात्मक कार्यसिध्दीने चालू राहणार आहे.

'ज्ञानगंगा' ही घरो-घरी पोहचली पाहिजे. भारत हा खेड्यापाड्यांचा देश आहे. खेडी स्वावलंबी व स्वयंपूर्ण व्हावीत हा महात्मा गांधींचा ध्यास व श्वास होता. पैसा नाही म्हणून शिक्षणाचे दरवाजे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी बंद असतात हा सतत भेडसवणारा प्रश्न डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या समोर होता. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी चांगल्या शिक्षणाच्या सोयी असाव्यात ही प्रेरणा व संकल्पना उराशी बाळगून संस्थेचे कार्यकारी विश्वस्त तथा अध्यक्ष आणि थोर सामाजिक कृतिशील विचारवंत मा. डॉ. कुमार सप्तर्षी यांनी आपल्या जन्मभूमीत २९ जून २००१ मध्ये 'राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालय', मु.पो. खेडनगर येथे विनानुदानित तत्वावर सुरू केले. या मातीशी असलेले आपले नाते त्यांनी अधिक घट्ट केले. 'एक स्त्री शिकली तर कुटुंब उभे राहते व स्वावलंबी समाज उभा राहू शकतो' हा संस्थेच्या विश्वस्तांचा विचार या मातीत रूजतोय, फुलतोय. भिमा नदीच्या काठी, निसर्गाच्या सान्निध्यात लावलेल्या या शिक्षणाच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर होत आहे. बहुजन समाजातील आणि ग्रामीण भागातील शिक्षणापासून वंचित असलेल्या या सवित्रीच्या लेकी शिकल्या पाहिजेत. त्या स्वतःच्या पायावर उभ्या रहाव्यात हे डॉ. कुमार सप्तर्षी यांचे स्वप्न त्यांच्या कृतीने खेडनगर येथील संस्थेच्या कुमारविश्व येथे प्रत्यक्षात अवतरले आहे.
या महाविद्यालयातील शिक्षणचा लाभ खेडनगर गावातील, तसेच या परिसरातील अनेक खेडेगाव, वाड्या वस्त्यावरील विद्यार्थी घेत आहेत. खेडनगर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालय नसते तर आतापर्यंत कित्येक गरीब विद्यार्थी व विशेषतः मुली उच्च शिक्षणापासून वंचित राहिल्या असत्या या महाविद्यालयाने आजपर्यंत अनेक चांगले विद्यार्थी घडविले आहेत. वाढती विद्यार्थी संख्या, विस्तारित इमारती बरोबरच या महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्ता आणि विद्यापीठात निकालाची उत्कृष्ट परंपरा सातत्याने राखली आहे. 'राष्ट्रीय सेवा योजना' आणि इतर उपक्रमांमध्येही उज्वल यश विद्यार्थ्यांनी मिळविले आहे. शिक्षणाकरिता, उद्याच्या उज्वल भवितव्याकरिता आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला सक्षम केले जाते. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी संस्थेचे विश्वस्त पदाधिकारी, प्राचार्य व महाविद्यालयातील कर्मचारी प्रयत्नशील व कार्यरत असतात. त्यामुळे अल्पावधीत हे महाविद्यालय ग्रामीण शिक्षणाचे आधुनिक आणि आदर्श शिक्षण केंद्र म्हणून नावारूपास येईल असा शिक्षण संस्था चालकांचा आत्मविश्वास आहे.

यापूर्वी महाविद्यालयात शिक्षण घेतलेले अनेक माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात उच्च पदावर काम करत आहेत. एकवीसाव्या शतकाची आव्हाने विचारात घेवून या ठिकाणी वाणिज्य, विज्ञान, संगणक, स्पर्धा परिक्षा केंद्र या विषयांचे अभ्यासक्रम लवकरच सुरू करण्याचा त्यांचा मानस आहे. विद्यार्थ्यांनी त्यामध्ये सहभागी व्हावे यासाठी आमचे प्रयत्न आहेत. त्याच बरोबर विविध क्षेत्रात विद्यार्थ्याने भरारी घ्यावी व त्यासाठी लागणारे मार्गदर्शन व सहाय्य हे महाविद्यालय करील. राष्ट्रपित्याच्या नावाने सुरू केलेल्या महाविद्यालयात स्वावलंबन, संस्कार, समाजसेवा, सामाजिक बांधीलकी याचे शिक्षण देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

समाजाच्या सर्वांगीण परिवर्तनासाठी सम्यक बदलासाठी, विद्यार्थी मित्रहो आपले शिक्षण व अध्ययनाचे कार्य निश्चितच मोलाचे तसेच दूरगामी परिणाम करणारे आहे. त्या दिशेने या महाविद्यालयाची वाटचाल राहील. या साऱ्या सिध्दतेसाठी आपणही आपला सहभाग द्यावा ही अपेक्षा करतो. पदवीनंतर आमचा विद्यार्थी हा कोठेही कमी पडणार नाही याची आम्ही ग्वाही देतो व या महाविद्यालयात आपले पूनःश्य एकदा मनःपूर्वक स्वागत करतो.

**प्राचार्य**
**राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालय**

भारतीय समाज विकास व संशोधन संस्था संचलित

# राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालय

कुमारविश्व मु.पो. खेडनगर, ता. कर्जत, जि. अहमदगनर ४१४४०३



## कला शाखा

## ✻ ठळक वैशिष्ट्ये ✻

- ✻ अनुभवी प्राध्यापक वृंद
- ✻ समृध्द ग्रंथालय व स्वतंत्र अभ्यासिका कक्ष
- ✻ उत्कृष्ट निकालाची परंपरा
- ✻ प्रशस्त इमारत, निसर्गरम्य परिसर
- ✻ राष्ट्रीय सेवा योजना
- ✻ भव्य क्रिडांगण, देशी विदेशी खेळाच्या सुविधा
- ✻ विद्यार्थ्यांना व्यक्तीगत मार्गदर्शन
- ✻ बहिःशाला शिक्षण व्याख्यानमाला
- ✻ प्रौढ शिक्षण, निरंतर व ज्ञानविस्तार विभाग
- ✻ नामवंत तज्ञांची व्याख्यानमाला, परिसंवाद, चर्चासत्रे, कार्यशाळा
- ✻ संगणक/इंटरनेट सुविधा
- ✻ बुक बँक योजना
- ✻ विद्यार्थी कल्याण योजना विभाग – कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना
- ✻ सरकारी व इतर विविध प्रकारच्या आर्थिक फी सवलती
- ✻ मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या आर्थिक सवलती
- ✻ सहल विभाग
- ✻ व्यवसायभिमुख प्रमाणपत्र अभ्सासक्रम

*** महाविद्यालयाची प्रशस्त इमारत व निसर्गरम्य परिसर –**
ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये कोणत्याही बाबतीत आपण शहरी विद्यार्थ्यांपेक्षा पाठीमागे आहोत अशी न्युनगंडाची भावना निर्माण होऊ नये याची काटेकोर दक्षता आम्ही घेत असतो. महाविद्यालयाची प्रशस्त इमारत २६ एकर विस्तीर्ण जमिनीत विसावलेली आहे. स्वतंत्र क्रिडांगणे या शिवाय अनेक प्रकारच्या वृक्षांची लागवड केली असल्याने भरपूर हिरवळ तर सर्वत्र पसरलेली असतेच पण त्या खेरीज भरपूर हवेमुळे महाविद्यालयाच्या परिसरातील वातावरण नेहमीच आल्हाददायक आणि प्रसन्न असते

*** समृध्द ग्रंथालय –**
अनेक दुर्मिळ व बहुविविध प्रकारच्या विपुल संदर्भ पुस्तकांनी समृध्द असलेले ग्रंथालय हे आमच्या महाविद्यालयाचे भूषण आहे. आज या ग्रंथालयात भरपूर ग्रंथ आणि मासिके असून वाचनालयात विविध विषयांची पुस्तके, नियतकालिके, वृत्तपत्रे, साप्ताहिके आहेत. याचा भरपूर विद्यार्थ्यांना लाभ घेता येईल.

*** बुक बँक योजना –**
महाविद्यालयातील हुशार व गरीब होतकरू विद्यार्थ्यांना वर्षभर अभ्यासक्रमातील सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिली जातात. विद्यार्थी या योजनेत सहभागी होऊ शकतात. यासाठी प्रति पुस्तक नाममात्र शुल्क आकारले जाते. या योजनेचा लाभ विद्यार्थी घेतात.

*** क्रिडा विभाग –**
महाविद्यालयात स्वतंत्र क्रिडाविभाग आहे. विद्यार्थ्यांच्या क्रिडा गुणांची योग्य वाढ व जोपासना होण्याकरिता महाविद्यालयाने कुशल क्रिडा अध्यापकाची नियुक्ती केली आहे. त्यामुळे या विभागातील प्रतिष्ठा वाढविण्याऱ्या गुणी विद्यार्थ्यांना सवलती देण्यात येतात. या विभागांतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना खेळांच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात.

*** सांस्कृतिक विभाग –**
विद्यार्थ्यामध्ये असलेल्या अनेक सुप्त गुणांची वाढ होण्यासाठी सांस्कृतिक विभागामार्फत अनेक उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये वादविवाद मंडळ, वाङ्मय मंडळ, अर्थशास्त्र नियोजन मंडळ, पर्यावरण मंडळ, व्याख्यानमाला, कार्यशाळा व इतर विविध सांस्कृतिक कार्यक्रम, उपक्रमांचा समावेश आहे.

*** कमवा व शिका योजना –**
महाविद्यालयात कमवा आणि शिका उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना करण्यासाठी छोट्या-छोट्या कामाचे नियोजन केले जाते. त्याबद्दल प्रत्येक तासाला आर्थिक मोबदला दिला जातो. त्याचा उपयोग त्यांना शिक्षणाकरिता करता येतो. शिवाय त्यातून विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबनाची सवय निर्माण होऊन श्रमप्रतिष्ठा वाढण्यास मदत होते. यासंबंधी सविस्तर तपशील महाविद्यालयाच्या कार्यालयात मिळू शकेल.

*** राष्ट्रीय सेवा योजना –**
युवकांच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास होऊन त्यांच्यामध्ये सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजना एन.एस.एस. विभाग सुरू केला आहे. या विभागात विद्यार्थ्यांना काही अटीवर मर्यादित प्रवेश दिला जातो. विद्यार्थ्याने वर्षभरात एकूण १२० तास आणि ७ दिवसांचे शिबीर पूर्ण करणे आवश्यक आहे. विद्यापीठ परिक्षेच्या वेळी ५ गुण देते.

*** महाविद्यालयाची वेळ**

| | | |
|---|---|---|
| १. कला शाखा पदवी विभाग | : | सकाळी ०८.०० वा ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत |
| २. कार्यालयाची वेळ | : | सकाळी १०.०० वा ते दुपारी ०५.०० वाजेपर्यंत |
| ३. आर्थिक व्यवहार वेळ | : | सकाळी १०.०० वा ते दुपारी ०२.०० वाजेपर्यंत |

## ✻ महाविद्यालय ओळखपत्र

या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याने ओळखपत्र घेणे बंधनकारक आहे. व महाविद्यालयाच्या परिसरामध्ये असताना प्रत्येक विद्यार्थ्याजवळ ओळखपत्र असणे ओळखपत्राशिवाय / अभ्यासिका यांचा लाभ घेता येणार नाही ओळखपत्र मिळविण्यासाठी विद्यार्थ्याने महाविद्यालयासाठी निर्धारित केलेले शुल्क भरून ओळखपत्र घ्यावे त्यानंतर स्वतःचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र चिकटवून आवश्यक ती माहिती भरून ओळखपत्रावर प्राचार्य व ग्रंथपालाची सही घ्यावी दरवर्षी नवीन ओळखपत्र घ्यावे.

ओळखपत्र दिनांक १५ ऑगस्ट पर्यंत घेणे बंधनकारक प्रत्येक विद्यार्थ्यास बंधनकारक राहिल.

## ✻ कुमार विश्व

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा व शैक्षणिक वर्षातील उपक्रमांचा आढावा कुमारविश्व नियतकालिकातून दरवर्षी प्रकाशित केला जातो. यामधून नवोदीत साहित्यिक, गुणवंत विद्यार्थी यांच्या गुणांना व साहित्यास त्यातून प्रसिध्द करतो. एक दर्जेदार व संग्रही नियतकालिक ही प्रतिमा कुमारविश्व ने निर्माण केली आहे.

## ✻ विद्यार्थ्याच्या वर्तनासंबंधी नियम -

१. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या सर्व विषयांच्या तासिकांना नियमाप्रमाणे वेळेवर हजर राहणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्याने प्रत्येक विषयाचे स्वाध्याय वेळेवर पूर्ण केले पाहिजेत.

३. ८०% उपस्थिती व योग्य वर्तणूक नसल्यास त्याला मिळणारी शिष्यवृत्ती किंवा इतर प्रकारची कोणतीही सरकारी किंवा अन्य सवलत वा शिष्यवृत्ती रद्द होवू शकते. वरील कारणामूळे शिष्यवृत्ती रद्द झाल्यास त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही

४. महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्याने ओळखपत्र महाविद्यालयाच्या आवारात वावरताना स्वतःजवळ बाळगणे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक क्लार्क अगर शिपाई यांनी केंव्हाही मागितल्यास ताबडतोब दाखविले पाहिजे

५. महाविद्यालयाच्या सुचना फलकावर विद्यार्थ्याच्या माहितीसाठी वेळोवेळी सुचना लावल्या जातील त्या विद्यार्थ्यांनी वाचाव्यात

६. वर्ग चालू असताना कोणत्याही विद्यार्थ्याने महाविद्यालयाच्या व्हरांड्यात रेंगाळू नये आपल्या वागण्याने चालू असलेल्या वर्गात कोणत्याही तऱ्हेचा उपद्रव होणार नाही याची वैयक्तिक व सामुदायिक खबरदारी घ्यावी.

७. विद्यार्थ्याचा पोशाख निटनेटका असावा.

८. महाविद्यालयाचे कामकाज, प्रतिष्ठा व शिस्त यांना बाधा येईल असे कोणतेही वर्तन महाविद्यालयात किंवा बाहेर करता कामा नये.

९. महाविद्यालयाशी व संस्थेशी संबंधित असलेली कोणतीही माहिती अथवा वृत्त प्राचार्यांच्या पूर्ण परवानगीशिवाय वृत्तपत्रामध्ये किंवा अन्य ठिकाणी प्रसिध्दीस देवू नये.

१०. वर्गात, ग्रंथालय, कार्यालयीन आवारात, महाविद्यालयीन कामकाज व शिस्त यासंबंधी वेळोवेळी दिलेल्या तोंडी सुचना पाळल्या पाहिजेत. प्रत्येक विद्यार्थ्याने खबरदारी घेतली पाहिजे. तसेच व समारंभाच्या वेळी सभागृहात शांतता राखण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने खबरदारी घेतली पाहिजे.

११. प्राध्यापकाशी बोलताना, वागताना, अगर प्रश्न किंवा शंका विचारताना विद्यार्थ्याने नम्रतेने व सौजन्याने वागले पाहिजे.

१२. महाविद्यालयाच्या इमारतीच्या भिंतीवर, दरवाज्यावर, खिडकीवर ओरखडणे किंवा लिहिणे, फर्निचरची मोडतोड किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या महाविद्यालय मालमत्तेचे कागदपत्रांचे नुकसान विद्यार्थ्यांकडून झाल्यास अशा प्रकारचे वर्तन हे गैरवर्तन समजन्यात येईल व संबंधीत विद्यार्थ्यावर योग्य ती कारदेशीर कारवाई केली जाईल

१३. महाविद्यालयात कोणाचीही रॅगिंग करू नये. तसेच कोणत्याही प्रकारची छेडछाड न करणे

१४. विद्यार्थ्यांनी मौल्यवान वस्तू आपल्या जबाबदारीवर आणाव्यात

१५. विद्यार्थ्यांनी स्वतःची वाहने कुलूप लावून आपल्या जबाबदारीवर वाहनस्थळावर लावावीत.
१६. महाविद्यालय परिसरात वा इमारतीमध्ये मोबाईल आणण्यास व वापरण्यास बंदी आहे.
१७. विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरात वा इमारतीमध्ये वा कार्यालयात तंबाखू,गुटखा, मावा, दारू, व तत्सम नशेच्या पदार्थाचे सेवन करू नये व बाळगू नये.
१८. महाविद्यालयात इतरांशी मारहाण न करणे
१९. मारहाण करणे बाबत महाविद्यालय विद्यार्थ्यांचे वा बाह्य व्यक्तिंचे गट निर्माण वा नियोजन न करणे तसेच मारहाण न करणे.
२०. वरील नियमांत बदल करण्याचा व त्यात उल्लेखलेल्या बाबीसंबंधी निर्णय देण्याचा प्राचार्यांना विद्यापीठ नियमानुसार अधिकार आहे. प्राचार्यांनी दिलेला निर्णय हा अंतिम असेल व तो संबंधीत विद्यार्थ्यावर बंधनकारक राहील.
२१. प्रत्येक विद्यार्थ्याने दि १५ ऑगस्ट रोजीच्या स्वातंत्र्य दिन व दि २६ जानेवारी रोजीच्या प्रजासत्ताक दिन या राष्ट्रीय सणास भारतीय राष्ट्र ध्वजारोहणाच्या कार्यक्रमास उपस्थित रहाणे आवश्यक आहे.
२२. सहलीसाठी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.
२३. विद्यार्थ्यांना स्टाफ रूम व प्रशासकीय कार्यालय काऊंटरच्या आत जाणास सक्त मनाई आहे.
२४. वर्गात अध्यापन चालू असताना बाहेरील विद्यार्थ्याने स्वतः वर्गातील विद्यार्थ्यास बाहेर बोलवू नये
२५. महाविद्यालयाद्वारे व विद्यापीठाद्वारे घेण्यात येणाऱ्या परिक्षेस विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावे.
२६. महाविद्यालयाद्वारे आयोजित शैक्षणिक उपक्रमांना उपस्थित रहावे.
२७. एकदा ट्रान्सफर सर्टिफिकेट (टी.सी.) घेऊन गेल्यानंतर त्याची मागणी पुन्हा करता येणार नाही

**गैरवर्तनाबाबत**

१. विद्यार्थ्यांच्या वर्तनासंबंधी असलेले नियमांचे उल्लंघन करणे
२. विद्यार्थ्यांने महाविद्यालयाच्या मालमत्तेचे वा महत्वपूर्ण कागदपत्रांचे नुकसान करणे
३. विद्यार्थ्याचे आक्षेपार्ह वर्तन असणे.
वरील प्रकारचे वर्तन हे गैरवर्तन समजले जाईल

**गैरवर्तनाबाबत शिक्षा**

१. विद्यार्थ्याचे महाविद्यालयातील वर्तमान प्रवेश रद्द करणे.
२. विद्यार्थ्यांने महाविद्यालयाच्या मालमत्तेचे वा महत्वपूर्ण कागदपत्रांचे नुकसान केल्यास असे वर्तन गैरवर्तन समजले जाईल. याबाबत झालेले आर्थिक नुकसान विद्यार्थ्याकडून दंड स्वरूपात वसूल करणे
३. ज्या विद्यार्थ्याचे वर्तन आक्षेपार्ह आहे अशांना पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश देण्यात येणार नाही

**विद्यार्थ्यांच्या पालकांना विनंती**

१. या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकाने पाल्याचा अभ्यास, वर्तनाबद्दल जागरूक असावे अशी कळकळीची विनंती आहे.
२. विद्यार्थ्यांची वर्गातील उपस्थिती, वर्तन, परीक्षांचा निकाल, अभ्यास याबाबत पालकांना माहिती कळविण्याचा प्राचार्य आटोकाट प्रयत्न करतात. ही बाब जाणीव लक्षात घ्यावी
३. सर्व परिक्षांना किंवा दैनंदीन तासांना आपला पाल्य उपस्थित राहतो का? याची पालकांनी खात्री करून घ्यावी व योग्य कारणामुळे आपला पाल्य परीक्षेला किंवा तासांना उपस्थित राहू शकला नाही तर याची पालकांनी प्राचार्यांना खात्री पटवून द्यावी
४. आपल्या पाल्याच्या वर्तनाच्या संदर्भात महाविद्यालयाकडून पत्र व संदेश प्राप्त झाल्यास पालकांनी त्याची गंभीर दखल घेऊन प्राचार्यांशी व्यक्तीशः भेट घ्यावी
५. विद्यार्थी, पालक, आणि शिक्षक हे शिक्षण व्यवस्थेतील तीन महत्वाचे घटक आहेत. त्या दृष्टीने पालकांनी महाविद्यालयाचे प्राचार्य व इतर अधिकारी वर्ग यांना सहकार्य करावे.

# ✻ प्रवेश घेण्यासंबंधी अधिक माहिती ✻

**प्रथम वर्ष कला शाखा**

या वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी बोर्डाची एच.एस.सी. किंवा डी.एड परीक्षा इंग्रजीसह उत्तीर्ण किंवा विद्यापीठाची/सरकारी मान्यता असलेली तत्सम परिक्षा विद्यार्थी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**प्रवेश घेताना खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.**

१. माहिती पुस्तिकेसोबत दिलेला प्रवेश नोंदणी अर्ज बिनचूक भरलेला असणे (स्वतःच्या अक्षरात भरून)
२. शुल्क पत्रकात दर्शविल्याप्रमाणे प्रवेश अर्जासोबत द्यावयाचे शुल्क असणे
३. पात्रता पत्र असणे
४. एच.एस.सी./डी.एड परीक्षा इंग्रजीसह /विद्यापीठाची किंवा सरकारी मान्यता असलेली तत्सम परिक्षा उत्तीर्ण असल्याचे अधिकृत मुळ गुणपत्रक व त्याच्या दोन साक्षांकित सत्यप्रती असणे
५. शाळा सोडल्याचा मुळ दाखला व त्याच्या दोन साक्षांकित सत्यप्रती असणे
६. मागावर्गीय शिष्यवृत्तीस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, नॉन क्रिमीलेअर दाखला असणे.

**पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील इतर महाविद्यालयातून येणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता**

**प्रवेश घेताना खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.**

१. माहिती पुस्तिकेसोबत दिलेला प्रवेश नोंदणी अर्ज बिनचूक भरलेला असणे (स्वतःच्या अक्षरात भरून)
२. शुल्क पत्रकात दर्शविल्याप्रमाणे प्रवेश अर्जासोबत द्यावयाचे शुल्क असणे
३. पात्रता पत्र व क्रमांक असणे
४. एच.एस.सी./डी.एड परीक्षा इंग्रजीसह /विद्यापीठाची किंवा सरकारी मान्यता असलेली तत्सम परिक्षा उत्तीर्ण असल्याचे अधिकृत मुळ गुणपत्रक व त्याच्या दोन साक्षांकित सत्यप्रती असणे
५. स्थानांतर प्रमाणपत्र व त्याच्या दोन साक्षांकित सत्यप्रती असणे
६. मागावर्गीय शिष्यवृत्तीस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, नॉन क्रिमीलेअर दाखला असणे.
७. पूर्वीच्या महाविद्यालयातील वर्तणूकीचा दाखला असणे.

**या महाविद्यालयातील गतवर्षीच्या विद्यार्थ्यांकरिता**

**प्रवेश घेताना खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.**

१. माहिती पुस्तिकेसोबत दिलेला प्रवेश नोंदणी अर्ज बिनचूक भरलेला असणे (स्वतःच्या अक्षरात भरून)
२. शुल्क पत्रकात दर्शविल्याप्रमाणे प्रवेश अर्जासोबत द्यावयाचे शुल्क असणे
३. पात्रता क्रमांक असणे
४. यापूर्वी परिक्षा उत्तीर्ण असल्याचे अधिकृत मुळ गुणपत्रक व त्याच्या दोन साक्षांकित सत्यप्रती असणे
५. मागावर्गीय शिष्यवृत्तीस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, नॉन क्रिमीलेअर दाखला असणे.

गतवर्षी अगर त्यापूर्वी महाविद्यालयात असणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रत्येक वर्षी या माहितीसोबत दिलेला छापील प्रवेश अर्ज बिनचूक भरून आवश्यक त्या शुल्कासह विद्यापीठाचा निकाल लागल्यापासून आठ दिवसाच्या आत कार्यालयात जमा करावा म्हणजे उशीरा आलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्याची वेळ येणार नाही.

**प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी नियम**

१. विद्यार्थ्यास प्रवेश दिल्यानंतर कोणत्याही सबबीवर भरलेली फी परत दिली जाणार नाही.

२. महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर जर पहिल्या सत्रात विद्यार्थ्यास त्याचे नाव महाविद्यालयातून कमी करावयाचे असेल तर विद्यार्थ्यास प्रथमसत्राची संपूर्ण फी भरावी लागेल. तसेच दूसऱ्या सत्रात नाव कमी करावयाचे असेल तर द्वितीय सत्र सुरू होण्यापूर्वी तसा दोन प्रतीत अर्ज करावा लागेल. अन्यथा सदर विद्यार्थ्यास द्वितीय सत्राची संपूर्ण फी भरावी लागेल. महाविद्यालयातून नाव कमी करण्यासाठी विद्यार्थ्याने स्वतःच्या हस्ताक्षरामध्ये लेखी अर्ज दोन प्रतीत मा. प्राचार्य यांच्याकडे दिला पाहिजे.

३. महाविद्यालयात प्रवेश घेताना गत वर्षातील विद्यार्थ्याची वर्तणूक लक्षात घेऊन महाविद्यालयात प्रवेश देणे किंवा न देणे प्राचार्यांच्या अधिकारात राहील.

४. विद्यापीठाच्या नियमानुसार दिलेल्या फी पत्रकाप्रमाणे वेळच्या वेळी फी भरावी लागेल.

**महत्वाची सूचना**

१. विद्यार्थ्यांनी आपल्या भावी व इतर योजना इ. कामासाठी मुळ दाखला, गुणपत्रक, जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला इ. कागदपत्रांच्या किमान १० प्रती झेरॉक्स करून साक्षांकित करून ठेवाव्यात प्रवेशानंतर मुळ कागदपत्र परत मिळणार नाहीत

२. प्रथम वर्षास विषय घेतला नसताना, द्वितीय वर्षास तो विषय स्पेशल म्हणून घ्यावयाचा असेल तर संबंधीत विद्यार्थ्यास त्या विषयाचा प्रथम वर्षाचा पेपर द्यावा लागेल.

३. विद्यार्थ्यांनी विषय निवडताना आपली आवड त्याचे महत्व याचा विचार करून पालक व प्राध्यापकांचा योग्य सल्ला घेऊनच निर्णय घ्यावा.

४. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाविषयी संबंधीत विषय प्राध्यापकांशी संपर्क साधावा.

५. या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण संचालकांनी ठरवून दिलेल्या तसेच विद्यापीठाने मान्य केलेल्या धोरणानुसार विविध प्रकारची फी महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये वेळेवर भरणे आवश्यक आहे. याबाबत विद्यार्थ्यांना काही अडचण आल्यास त्यांनी प्राचार्यांशी संपर्क साधावा फी तपशील महाविद्यालयाच्या सुचना फलकावर लावले जाईल. तो विद्यार्थ्यांनी पहावा.

**विद्यापीठ सत्र मान्यतेच्या अटी पुढीलप्रमाणे**

१. प्रत्येक विद्यार्थ्याने प्रत्येक टर्मला एकूण कामाच्या दिवसाच्या ८० दिवस उपस्थित राहीले पाहिजे.

२. प्रथम वर्ष कला वर्गाच्या सर्व विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे वैद्यकिय तपासणी करून घेणे बंधनकारक आहे. जे विद्यार्थी वैद्यकिय तपासणी करून घेणार नाहीत त्यांना परीक्षेचा फॉर्म भरता येणार नाही

३. प्रत्येक विद्यार्थ्याने वेळोवेळी होणाऱ्या चर्चासत्रांना व महाविद्यालयीन इतर कार्यक्रमांना उपस्थित राहून सहभागी होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची एकूण प्रगती व वागणूक समाधानकारक आहे. असे वाटल्यावरच त्याचा विद्यापीठाचा प्रवेश अर्ज विद्यापीठाकडे पाठविला जाईल. आवश्यक बाबींची पूर्तता न करणाऱ्या नियमबाह्य वागणाऱ्या विद्यार्थ्यांचा विद्यापीठ परीक्षा फॉर्म न पाठविण्याचा अधिकार विद्यापीठाच्या नियमानुसार महाविद्यालयास आहे. स

**भारत सरकार (GOI) शिष्यवृत्ती :**

या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना भारत सरकारच्या वतीने शिष्यवृत्ती दिली जाते. या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी विहित नमून्यातील अर्ज संबंधीत संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने नमूद केलेल्या तारखेच्या आत भरून त्याची प्रत महाविद्यालयात दाखल करणे आवश्यक आहे. नमूद केलेल्या तारखेच्यानंतर उशीरा प्राप्त होणारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

**✻ अर्जासोबत खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.**

१. नवीन शिष्यवृत्ती आवेदन पत्रावर विद्यार्थ्याचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र लावून त्यावर प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी असणे.
२. स्थलांतर प्रमाणपत्र असणे
३. जातीचे प्रमाणपत्र असणे
४. वडिल/पालक यांच्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र असणे
५. वडिल नसल्यास त्यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची सत्यप्रत असणे
६. आई-वडील सेवेत असल्यास त्यांचे मार्च महिन्याचे वेतन प्रमाणपत्र असणे
७. गुणपत्रिकेची छायांकित प्रत
८. विद्यार्थीनी विवाहित असल्यास तिने तिच्या पतीच्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र द्यावे
९. इतर जिल्ह्यातून शिक्षणासाठी आलेल्यांनी जिल्हा हस्तांतर याबद्दलचे प्रमाणपत्र देणे
१०. युनिअन बँक ऑफ इंडिया शाखा खेडनगर येथील बँकेत स्वतःचे खाते असणे आवश्यक आहे. अर्जासोबत खाते पुस्तकाची छायांकित प्रत असणे

**✻ इतर अटीः-**

१. शिष्यवृत्तीची रक्कम घेताना विद्यार्थ्यांची महाविद्यालयाच्या वर्गात ७५ उपस्थिती आवश्यक आहे.
२. शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न रू १,००,०००/- पेक्षा कमी असणे आवश्यक आहे.
३. विद्यार्थ्यांची जात शासनाने मान्य केलेल्या मागासवर्गीय यादीमध्ये (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती आणि भटक्या, निम भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग)समाविष्ट असणे आवश्यक आहे.

**✻ वरिष्ठ महाविद्यालय अभ्यासक्रम**

**प्रथम वर्ष कला** (एकूण सहा पेपर)

| | | |
|---|---|---|
| अ. आवश्यक विषय | १. इंग्रजी अनिवार्य | |
| ब. भाषा विषय | २. मराठी / हिन्दी / किंवा ॲडिशनल इंग्रजी पैकी एक<br>ब गटातील कमीत कमी एक भाषा विषय घेणे आवश्यक आहे | |
| क. सामान्य स्तर | ३. इतिहास | ४. भूगोल |
| | ५. राज्यशास्त्र | ६. अर्थशास्त्र |

टीपः- विद्यार्थ्यांनी ब व क गटातील एकूण पाच विषय घेणे आवश्यक आहे.
द्वितीय वर्षासाठी जो स्पेशल विषय घ्यावयाचा आहे तो विषय प्रथम वर्षासाठी घेणे आवश्यक आहे

**द्वितीय वर्ष कला** (एकूण सहा पेपर)

प्रथम वर्षासाठी निवडलेल्या विषयामधुनच द्वितीय वर्षासाठी विषय घेता येतील

| | | | |
|---|---|---|---|
| अ. आवश्यक विषय | १. इंग्रजी अनिवार्य | | |
| ब. स्पेशल विषय | २. मराठी / हिन्दी / इंग्रजी / इतिहास पैकी कोणत्याही एका विषयाची निवड करावयाची आहे. त्या विषयाचे दोन स्पेशल व एक जनरल असे तीन पेपर राहतील. | | |
| क. सामान्य स्तर | ३. इतिहास | ४. भूगोल | ५. राज्यशास्त्र |
| | ६. अर्थशास्त्र | ७. मराठी | ८. हिन्दी |

टीपः- विद्यार्थ्यांनी ब गटातील निवडलेला विषय सोडून क गटातील दोन विषयाची निवड करावयाची आहे.

**तृतीय वर्ष कला** (एकूण सहा पेपर)

द्वितीय वर्षासाठी निवडलेला स्पेशल विषय व जनरल विषय तृतीय वर्षासाठी कायम असतील.

## ✻ परीक्षासंबंधी माहिती

कलाशाखेच्या सत्रांत परीक्षा

पुणे विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार शैक्षणिक वर्ष २००४ - २००५ पासून पत्रात परीक्षा महाविद्यालयाकडून घेतली जाते. या परीक्षेचे स्वरूप पुढीलप्रमाणे

१. विद्यार्थ्यांनी जे विषय घेतले आहेत, त्या प्रत्येक विषयासाठी सत्रांत परीक्षा देणे आवश्यक आहे.
२. सत्रांत परीक्षा ६० गुणांची असते. या ६० गुणांचे १/३ गुण म्हणजे २० पैकी गुण काढून विद्यापीठाकडे पाठविले जातात. हे गुण वार्षिक परीक्षेच्या गुणांमध्ये समाविष्ट केले जातात.
३. वार्षिक परीक्षा विद्यापीठाकडून घेतली जाते सदर लेखी परीक्षा ही ८० गुणांची असते सतांत परीक्षेचे २० गुण व वार्षिक परीक्षेचे ८० गुण अशी एकूण १०० गुणांची प्रत्येक विषयाची परीक्षा घेतली जाते.
४. सत्रांत परीक्षा प्रथम सत्राच्या शेवटी घेतली जाते.
५. अपवाद - पुढील विषयांची वार्षिक परीक्षा ८० ऐवजी ६० गुणांची राहिल.
एस.वाय.बी.ए. इंग्रजी २० मार्कांची सत्रांत परीक्षा + २० गुणांची प्रात्यक्षिक परीक्षा व ६० गुणांची वार्षिक परीक्षा असेल.

वरिष्ठ महाविद्यालय परीक्षा

बी.ए प्रथम द्वितीय आणि तृतीय वर्गाच्या अभ्यासक्रमासाठी सत्रांत परीक्षा घेण्यात येईल. प्रशासकीय दृष्ट्या टर्म मंजूर करण्यासाठी परीक्षेतील गुण लक्षात घेण्यात येईल. सत्रांत परीक्षेचे स्वरूप साधारणपणे स्वतंत्र परीक्षेसारखेच राहील या परीक्षेत प्रात्यक्षिक परीक्षेचा अंतर्भाव नसेल. सत्रांत परीक्षा महाविद्यालय आपल्या सोयीनुसार प्रथम सत्र संपण्यापूर्वी घेईल.

बी.ए. प्रथम वर्गाच्या (F.Y.B.A.) सत्रांत व वार्षिक परीक्षा महाविद्यालयामार्फत घेतल्या जातील.

पर्यावरण जाणीव जागृती

हा विषय एस.वाय.बी.ए. साठी अनिवार्य आहे. या विद्यार्थ्यांना या विषयाची लेखी परीक्षा, प्रोजेक्ट द्यावा लागतो. ही परीक्षा दिली नाही तर पदवी परीक्षा निकाल राखीव ठेवला जातो. म्हणून ही परीक्षा देणे अनिवार्य आहे.

## ✻ व्यवसायभिमुख प्रमाणपत्र अभ्सासक्रम

महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना स्वावलंबी होण्यासाठी महाविद्यालयात खालील व्यावसायभिमुख प्रमाणपत्र अभ्यासक्रम आहेत. खालील अभ्यासक्रमापैकी एका अभ्यासक्रमाची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे.

अभ्यासक्रम

१. सेंद्रीय शेती
२. मत्स्यपालन
३. सेंद्रीय खत निर्मिती
४. नर्सरी
५. मशरूम कल्टीवेशन
६. संगणक साक्षरता

## SAVITRIBAI PHULE UNIVERSITY OF PUNE

## CIRCULAR NO. 170 OF 2009

It is here by noticed for information of all concerned that in view of the judgement and order dated 11.02.2009. of the Honorable Supreme Court of India in the matter of the Universityof KeralaV/s The Council of Principals of College in Kerala and others, the Following Measures shall be taken to PreventRaging in the College/Institutions.

1. In the prospectus of the Higher Educational Institutions, it should be mentioned that if any incident fo ragging comes to the notice of the authority concerned, the accused student will be given an opportunity to explain and if his explanations is not satisfactory the authority would expel him from the institution. the number of cases of ragging and punishment given by the educational institution in the previous academic year should also be incorporated in the prospectus of Higher educational institution.

2. Anti ragging committees and squads to check ragging should be constituted and the names and telephone numbers of official to be contacted by the students in case of ragging, should also be Published.

3. Counselling sessions and orientation courses for senior and fresh students should be conducted.

4. All Institution should do whatever they can by ensuring punishment to the students found guilty of ragging, giving wide Publicity to such punishments to act as a deterrent, strict enforcement of the various measures for preventing ragging.

5. Appropriate massages ragarding zero tolerance towards ragging should be incorporated in admission notice / Advertisements.

6. Audio-Video Campaign should be undertaken at the commencement of the new academic session to Prevent ragging.

7. Efforts to publicise and sensitise students ragging the menance fo ragging should be mede.

8. Awaremess amongst students through student unions about the bad effects of raging should be generated.

9. In appropriate case, if the authoities are prima facie satisfied about the reeant act of any student, they can suspend the student from the Institution and the Hostel, if any pending final decision and given opportunity to him to have his say. the Police should be informed immediately and criminal law should be set into motion.

It is further noticed that, the colleges / Institution shall submit report to the Director, Student welfare of the university, every six months, regarding implementation of the measures taken by them to prevent ragging.

Ref. No : SW/1429/09
Date : 21 May 2009

Registrar
University of Pune

Copy for Information to
1. The Principal of Affilated Colleges
2. The Head of Recongnised Institutions
3. The Heads of University Departments
4. The Heads of Section in the University office

**MAHARASHTRA ACT No. XXXIII OF 19991**
**[ THE MAHARASHTRA PROHIBITION OF RAGGING ACT 1999 ]**

( This Act received the assent of the Governor on the 13th May 1999; assent was first published in the Maharashtra Government Gazette, Part IV, Extraordinary, on the 15th May 1999.)

**An Act to prohibit raggingin educational institutions in the State of Maharashtra.**

WHEREAS it is expedient to enact a special law to prohibit ragging in educational institutions in the State of Maharashtra It is hereby enacted in the Fiftieth Year of the Republic of India as follows:-

1. (1) This Act mav be called the Maharashtra Prohibition Short title of Ragging Act,1999.
   (2) It shall come into forceRll such *date as the State Government may, by notification in the *Official Gazette*, appoint.
2. In this Act : unless the context otherwise requires:-
   (a) "educational institution" means and includes a college, or other institution by whatever name called, carrying on the activity or imparting education therein (either exclusively or among other activities); and includes on orphanage or a boarding home or hostel or a tutorial institution or any other premises attached thereto;
   (b) " Head of the educational institution" means the Vice-Chancellor of the University, Dean of Medical Faculty, Directbr of the Institution or the Principal, Headmaster or the person responsibel for the management of the educational institution.
   (c) "ragging" means display of disorderly conduct, doing of any act which causes or is likely to cause physical or psychological harm or raise apprehension or fear or shame or embarrassment to a student in any educational institution and includes -
   (i) teasing, abusing, threatening or playing practical jokes on, or causing hurt to, such student; or
   (ii) asking a student to do any act or perfonn something which such student will not, in the ordinary course, willingly, do.
3. Ragging within or outside of any educational institution is Prohabited
4. Whoever directly or indirectly commits, participates in, abets or propagates ragging within or outside any educational institution shall, on conviction, be punished with imprisonment for a term which may extend to two years and shall also be liable to a fine which may extend to ten thousand rupees.
5. Any student convicted of an offence under section 4 shall be displissed from the educational institution and such student shall not be admitted in any other educational institution for a period of five years from the date of order of such dismissal.
6. (1) Whenever any student or, as the case may be, the parent or guardian, or a teacher of an educational institution complains, in writing, of ragtlng to the head of the educational institution, the head of that educational institution shall, without prejudice to the foregoing provisions, within seven days of the receipt of the complaint, enquire into the matter mentioned in the complaint and if, *prima facie,* it is found, true, suspend the student who is accused of the offence, and shall, immediately forward the complaint to the Police Station having jurisdiction over the area in which the educational institution is situated, for further action.
   (2) Where, on enquiry by the head of the educational institution, it is proved that there is no substance, *prima facie*, in the complaint received under sub-section (1). he shall Intimate the fact, in writing, to the complainant.
   (3) The decision of the head of the educational institution that the student has indulged in ragging under sub-section (1), shall be final.
7. If the head of the educational institution fails or neglects to take action in the manner specified in section 6 when a complaint of ragging is made, such person shall be deemed to have abetted the offence of ragging and shall, on conviction, be punished as provided for in section 4.
8. (1) The State Government may by notification in the *Official Gazette*, make rules for carrying out all or any of the purposes of this Act.
   (2) Every rule made under this Act shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature, while it is in session for a total period of thirty days, which may be comprised in one session or in two or more successive sessions, and if, before the expiry of the session in which it is so laid or the session immediately following, both Houses agree in making any modification in the rules or both Houses agree that the rule should not be made, and notify such decision in the *Official Gazette*, the rule shall, from the date of publication of such notification, have effect only in such modified form or be of no effect, as the case may be; so however, that any such modification or annulment shall be without prejudice to the validity of anything previously done or omitted to be done under that rule

| जनरल रजि क्र. | |
|---|---|

भारतीय समाज विकास व संशोधन संस्था संचलित

# राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालय

कुमारविश्व मु.पो. खेडनगर,

ता. कर्जत, जि. अहमदगनर ४१४४०३



## (कला विभाग)

## वरिष्ठ महाविद्यालय प्रवेश अर्ज

## सन २०१ - २०१

प्रति,

**मा. प्राचार्य**

राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालय

मु.पो. खेडनगर, ता. कर्जत,

जि. अहमदनगर ४१४४०३

आदरणीय सर,

मी, (आडनाव प्रथम) ____________________

आपल्या महाविद्यालयातील प्रथम वर्ष / द्वितीय वर्ष / तृतीय वर्ष कला विद्याशाखेच्या सन २० - २० या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेऊ इच्छितो / इच्छिते. मी प्रमाणित करतो/करते की, या अर्जात मी नमूद केलेली सर्व माहिती सत्य व बरोबर आहे. महाविद्यालयाच्या सर्व नियमांची मी माहिती घेतली आहे. महाविद्यालयाच्या आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सर्व नियमांचे काटेकोर व प्रामाणिकरित्या पूर्णपणे पालन करण्याची संपूर्ण जबाबदारी माझी आहे.

महाविद्यालयाच्या शांततेस, कामकाजास, शिस्तीमध्ये वा प्रतिष्ठेला बाधक ठरणारे वर्तन किंवा अन्य कोणतेही गैरवर्तन माझ्याकडून घडल्यास महाविद्यालय वा महाविद्यालयाचे पदाधिकारी जो निर्णय घेतील तो निर्णय मला मान्य राहील. त्यास माझी कोणत्याही प्रकारे तक्रार राहणार नाही.

प्रवेश अर्जासोबत आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करणे आणि विद्यापीठाकडून प्रवेश पात्रतेस मान्यता होणे या अटीवर माझा महाविद्यालयातील प्रवेश हा विषय निर्धारित आहे. महाविद्यालय त्यास जबाबदार नाही याची मला पूर्णपणे जाणीव आहे. तरी मे. प्राचार्य साहेबांनी मला महाविद्यालयात प्रवेश द्यावा ही नम्र विनंती.

I, hearby Submit to the disciplinary jurisdiction of the Vice-Chancellor and the other offices and authority of the University and the Authorities of the College and Institution and small observe and abide by the rules made by the Vice-Chancellor in the behalf and also by the rules made by the Principal of the College. Head of the Institution.

दिनांक

आपला / आपली

**विद्यार्थ्याची सही**

## वैयक्तिक माहिती

| क्र. | तपशील | विद्यार्थ्याने भरावयाची माहिती |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव<br>आडनाव प्रथम मराठीत | |
| २ | इंग्रजीत संपूर्ण नाव<br>आडनाव प्रथम कॅपिटलमध्ये | |
| ३ | घरचा कायमचा पत्ता | पीन कोड |
| ४ | स्थानिक पत्ता | पीन कोड |
| ५ | संपर्क - फोन / मोबाईल क्र<br>ई-मेल | |
| ६ | जन्म ठिकाण<br>जन्म दिनांक अक्षरात | जन्म दिनांक अंकात |
| ७ | स्त्री / पुरूष | विवाहित / अविविहित |
| ८ | पुर्ण वय | दिनांक १/७/२०१ रोजी |
| ९ | धर्म<br>जात | अनुसुचित जाती / अनु जमाती / भटक्या व विमुक्त जमाती / इतर मागासलेला वर्ग |
| | **पालकांची माहिती** | |
| १० | पालकाचे संपूर्ण नाव<br>आडनाव प्रथम | |
| ११ | आईचे संपूर्ण नाव<br>आडनाव प्रथम | |
| १२ | घरचा कायमचा पत्ता | पीन कोड |
| १३ | नौकरी असल्यास नौकरीचा सद्याचा पत्ता | पीन कोड |
| १४ | विद्यार्थ्याशी नाते | वडील / आई / भाऊ / किंवा इतर |
| १५ | व्यवसाय | वार्षिक उत्पन्न |

मी माझ्या पाल्यास आपल्या महाविद्यालयात प्रवेश घेण्यास संमती देत आहे. महाविद्यालयाच्या प्रवेशाबाबतच्या नियमांची माहिती घेतली आहे व ते मला मान्य आहेत. महाविद्यालयाचे सर्व नियम व शिस्त माझ्या पाल्याकडून पाळली जाईल, याकडे मी स्वतः लक्ष देईन. माझ्या पाल्याने महाविद्यालयाच्या नियमांचे पालन न केल्यास महाविद्यालय त्याच्यासंबंधी जो निर्णय घेईल तो मला मान्य राहील.

दिनांक : / /

पालकाची सही

# मागील परिक्षेची शैक्षणिक माहिती

| क्र. | तपशील | विद्यार्थ्याने भरावयाची माहिती |
|---|---|---|
| १६ | यापूर्वी शिकत असलेल्या विद्यालय/महाविद्यालयाचे नाव | |
| १७ | यापूर्वी उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचे नाव | |
| १८ | परिक्षा मंडळ / विद्यापीठ इ. | |
| १९ | परिक्षा केंद्र / परिक्षा क्रमांक | |
| २० | परिक्षा उत्तीर्ण झालेचे | महिना वर्ष |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | विषयाचे नाव | | | | | | | | | | एकूण |
| २२ | विषयाचे एकूण गुण | | | | | | | | | | |
| २३ | मिळालेले गुण | | | | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| २४ | परिक्षेच्या गुणांची श्रेणी | परिक्षेच्या गुणांची टक्केवारी |
| २५ | **चालू शैक्षणिक अभ्यासक्रम सन २०१ - २०१ मध्ये निवडलेले विषय, पेपर्स** | |

१. ..........................

२. ..........................

३. ..........................

४. ..........................

५. ..........................

६. ..........................

(कार्यालयीन कामकाजसाठी)

| Class | Division Admission Number. | E.B.C. / B.C. F.F. / Paying etc. | L.C. or T.C. | Eligibility and Mark List | Hostel Fee | College Fee |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

प्रवेश अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे

- ☐ मागील परिक्षेचे गुणपत्रकाची नक्कल प्रत
- ☐ शाळा सोडल्याचा मूळ दाखला
- ☐ विद्यार्थ्याच्या नावे बँकेत खाते असलेल्या बँक पासबुकाची झेरॉक्स
- ☐ आधारकार्ड झेरॉक्स

मागावर्गीय शिष्यवृत्तीस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी खालील कागदपत्रे जोडणे

- ☐ जात प्रमाणपत्र,
- ☐ उत्पन्नाचा दाखला,
- ☐ नॉन क्रिमीलेअर दाखला

कनिष्ठ लिपीक वरिष्ठ लिपीक विद्याशाखाप्रमुख

## प्राचार्यांचा निर्णय

श्री. कु. सौ. ______________________________

१. यांना विद्यार्थ्यांच्या पात्रतेसंबंधी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पात्रतेचा दाखला (Eligibility Certificate) घेईपर्यंत प्रथम वर्ष साहित्य वर्गात तात्पुरता प्रवेश देण्यात आला आहे / नाही

२. द्वितीय / तृतीय वर्ष कला या वर्गात प्रवेश देण्यात आला आहे / नाही

दिनांक : / / २०१

ठिकाण : खेडनगर

**प्राचार्य**
राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालय

ंदिनांक

प्रति,

**मा. प्राचार्य**

राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालय
मु.पो. खेडनगर, ता. कर्जत,
जि. अहमदनगर ४१४४०३

**विषय** :- **व्यवसायभिमुख प्रमाणपत्र अभ्यासक्रम**

**अभ्यासक्रम** :- ..............................................................

आदरणीय सर,

मी, आपल्या महाविद्यालयात कला विद्याशाखा प्रथम / द्वितीय / तृतीय वर्ष सन २० - २० या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश घेतला आहे. महाविद्यालयाच्या व्यवसायभिमुख प्रमाणपत्र अभ्यासक्रमातील वरील अभ्सायक्रमाची मी निवड केली असून प्रवेश घेण्यासाठी इच्छुक आहे. त्या अभ्यासक्रमासाठी मला प्रवेश देण्यात यावा ही नम्र विनंती.

आपला आज्ञाधारक विद्यार्थी

संपूर्ण नाव ______________________

---

दिनांक

प्रति,

**मा. प्राचार्य**

राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालय
मु.पो. खेडनगर, ता. कर्जत,
जि. अहमदनगर ४१४४०३

**विषय :- उपस्थिती बाबत हमीपत्र**

आदरणीय सर,

मी, आपल्या महाविद्यालयात कला विद्याशाखा प्रथम / द्वितीय / तृतीय वर्षासाठी प्रवेश घेतला आहे. महाविद्यालयाच्या सर्व नियमांची मी माहिती घेतली आहे. महाविद्यालयाने **वर्गातील अध्यापनासाठी उपस्थितीबाबत आवश्यक प्रमाण टक्केवारीची** परिपूर्ण माहिती मला दिलेली आहे. मी उपस्थितीबाबत सजग राहून ती परिपूर्ण करण्याची हमी या पत्राद्वारे देत आहे.

माझ्याकडून उपस्थितीबाबतची आवश्यक प्रमाण टक्केवारी पूर्ण न झाल्यास महाविद्यालय वा महाविद्यालयाचे पदाधिकारी जो निर्णय घेतील तो निर्णय मला मान्य राहील. त्यास माझी कोणत्याही प्रकारे तक्रार राहणार नाही.

आपला आज्ञाधारक विद्यार्थी

संपूर्ण नाव ______________________

ANNEXURE I

**AFFIDAVIT BY THE STUDENT**

1) I, ______________________________________________________ Class ____________

Roll Number _______ s/o d/o Mr./Mrs./Ms _________________________________________

having been admitted to Indian Institute for Social Development and Research's Rashtrapita Mahtma Gandhi Mahavidyalaya, 'Kumarvishwa', At/post - Khednagar, Tal - Karjat, Dist - Ahmednagar 414403 have received a copy of the UGC Regulations on Curbing the Menace of Raging in Higher Educational Institutions, 2009, (hereinafter called the "Regulations") carefully read and fully understood the provisions contained in the said regulations, available on www.ugc.ac.in

2) I have, in particular, perued clause 3 of the Regulations and am aware as to what constitutes ragging.

3) I have also, in particular, perused clause 7 and clause 9.1 of the Regulations and am fully aware of the penal and administrative action that is liable to be taken against me in case I am found guilty of or abetting ragging, actively or passively, or being part of a conspiracy to promote ragging.

4) I hereby solemnly aver and undertake that

a) I will not indulge in any behaviour or act that may be constituted as ragging under clause 3 of the Regulations.

b) I will not participate in or abet or propagate through any act of commission or omission that may be constituted as ragging under clause 3 of the regulations.

5) I hereby affirm that, if found guilty of ragging, I am liable for punishment according to clause 9.1 of the Regulations, without prejudice to any other criminal action that may be taken against me under any penal law or any law for the time being in force.

6) I hereby declare that I have not been expelled or debarred from admission in any institution in the country on account -of being found guilty of, abetting or being part of a conspiracy to promote, ragging; and further affirm that, in case the declaration is found to be untrue, I am aware that my admission is liable to be cancelled.

Declared this ................ day of..................month of................ year.

Signature of Deponent ____________________

---

VERIFICATION

Verified that the contents of this are true to the best of my knowledge and no part of the affidavit is false and nothing has been concealed or misstated therein.

Verified at (place)__________on this the_____(day) of________(month)________(year)

Signature of Deponent ____________________

Solemnly affirmed and signed In my presence on this the the_____(day) of ______ (month) _______(year) after reading the contents of this affidavit.

OATH COMMISSIONER __________________

ANNEXURE I

**AFFIDAVIT BY PARENT / GUARDIAN**

1) I, Mr./Mrs/Ms. ____________________________________________________________

(full Name of parent/Guardian)

father/mother/guardian of , _____________________________________________________

Class __________ having been admitted to Indian Institute for Social Development and Research's Rashtrapita Mahtma Gandhi Mahavidyalaya, 'Kumarvishwa', At/post - Khednagar, Tal - Karjat, Dist - Ahmednagar 414403 have received a copy of the UGC Regulations on Curbing the Menace of Raging in Higher Educational Institutions, 2009, (hereinafter called the "Regulations") carefully read and fully understood the provisions contained in the said regulations, available on www.ugc.ac.in

2) I have, in particular, perued clause 3 of the Regulations and am aware as to what constitutes ragging.

3) I have also, in particular, perused clause 7 and clause 9.1 of the Regulations and am fully aware of the penal and administrative action that is liable to be taken against me in case I am found guilty of or abetting ragging, actively or passively, or being part of a conspiracy to promote ragging.

4) I hereby solemnly aver and undertake that

a) I will not indulge in any behaviour or act that may be constituted as ragging under clause 3 of the Regulations.

b) I will not participate in or abet or propagate through any act of commission or omission that may be constituted as ragging under clause 3 of the regulations.

5) I hereby affirm that, if found guilty of ragging, I am liable for punishment according to clause 9.1 of the Regulations, without prejudice to any other criminal action that may be taken against me under any penal law or any law for the time being in force.

6) I hereby declare that I have not been expelled or debarred from admission in any institution in the country on account -of being found guilty of, abetting or being part of a conspiracy to promote, ragging; and further affirm that, in case the declaration is found to be untrue, I am aware that my admission is liable to be cancelled.

Declared this ............... day of..................month of............... year.

Signature of Deponent ____________________

Name ______________________________________________________________________

Address ____________________________________________________________________

Telephone / Mobile No. ________________________________________________________

_________________________________________________________________________

VERIFICATION

Verified that the contents of this are true to the best of my knowledge and no part of the affidavit is false and nothing has been concealed or misstated therein.

Verified at (place)__________on this the_____(day) of________(month)________(year)

Signature of Deponent ____________________

Solemnly affirmed and signed In my presence on this the the_____(day) of ______ (month) _______(year) after reading the contents of this affidavit.

OATH COMMISSIONER __________________